सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक २७ • सोमवार दि.१९ ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## राज्यात वादळी पावसाचा इशारा

मुंबई/प्रतिनिधी-राज्यात उष्ण आणि दमट हवामानाचा त्रास वाढत असतानाच मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि पूर्व विदर्भातील काही भागांत विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, बीड, लातूर, धाराशिव, नागपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. दुसरीकडे, राज्याच्या उर्वरित भागांत उन्हाचा चटका आणि उकाडा कायम राहण्याचा अंदाज आहे.

हवामान विभागाने आज जारी केलेल्या अंदाजानुसार घाटमाथ्यावर पावसाची शक्यता असून, नागपूर आणि गडचिरोली परिसरात विजांच्या कडकडाटासह पान ४ वर

## टायगर श्रॉफवरील हल्ला प्रकरणी ३ आरोपी जेरबंद

### श्रेयवादावरुन मुंबई-कोटा पोलिसांत चर्चा!

मुंबई/प्रतिनिधी-बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफ याच्या कारवर गोळीबार केल्याप्रकरणी तीन संशयितांना राजस्थानमधील कोटा रेल्वे स्थानकावर ताब्यात घेण्यात आले. मुंबई पोलिसांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण माहितीच्या आधारे कोटा पोलिसांनी सोमवारी सकाळी ही कारवाई केली. मात्र, कारवाईचे श्रेय घेण्यावरून दोन्ही पोलीस दलांमध्ये अप्रत्यक्षपणे चर्चा रंगली आहे.

जुहू परिसरात गोळीबार केल्यानंतर संशयित आरोपी वसईहून जयपूरकडे जाणाऱ्या रेल्वेने दिल्लीमार्गे नेपाळला पळून जाण्याच्या तयारीत होते. मुंबई पोलिसांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे कोटा पोलिसांनी सापळा रचून रेहान ऊर्फ सुक्का,



हृतिक कुर्मी ऊर्फ रोशन आणि एका अल्पवयीन संशयिताला ताब्यात घेतले. कोटा शहराच्या पोलीस अधीक्षक तेजस्विनी गौतम यांनी पत्रकार परिषदेत या कारवाईची माहिती दिली. तिन्ही संशयितांना मुंबई पोलिसांच्या ताब्यात देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.दरम्यान, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी समाजमाध्यमांवर यशाचे अनेक दावेदार असतात; अपयशाची जबाबदारी मात्र कुणी घेत नाही, अशी सूचक पोस्ट केली. या पोस्टचा रोख कोटा पोलिसांकडे असल्याची चर्चा सुरू झाली आहे. मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीमुळे आरोपींपर्यंत पोहोचणे शक्य झाल्याचा दावा होत असताना, कोटा पोलिसांनी पत्रकार परिषदेत कारवाईची माहिती दिल्याने श्रेयवादाचा मुद्दा चर्चेत आला आहे. आता या गोळीबारामागील कारण आणि अन्य व्यक्तींचा सहभाग तपासातून स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे.

## दसऱ्यानिमित्त मंगळवारी हल्ला-महला मिरवणूक

स.रविन्द्रसिंघ मोदी

नांदेड-दरवर्षी प्रमाणे नांदेडच्या मुख्य गुरुद्वारा तखत सचखंड हजुरसाहिब येथे पारंपरिक दशहरा हल्ला-महला सण साजरा करण्यात येणार आहे. येथे दसरा सण साजरा करण्यासाठी बाहेरून हजारोच्या संख्येत भाविक पोहचले आहेत. निहंग सिंघांचे पाच ते सहा सशस्त्र दल देखील नांदेडमध्ये दशहरा हल्ला-महला खेळण्यासाठी दाखल झाले आहेत. त्यात बाबा बिधिचंदजी दल, तरना दल, बूढा दल इतियादिचा समावेश आहे.

या दलासोबत हत्ती, घोडे आणि निहंग सिंघ आहेत. गुरुद्वारा बंदाघाट साहेब, गुरुद्वारा नगीनाघाट साहेब, गुरुद्वारा सिख छावनी, गुरुद्वारा माता साहेब देवाजी ठिकानावर दलांचे वास्तव्य असून गुरुबानीचे पठन आणि सेवा सुरु आहे. काही ठिकाणी लंगर सेवा ही सुरु आहे. मंगळवारी पहाटे ४ वाजता पासून दशहरा सणाचे कार्यक्रम सुरु होणार आहेत. सकाळी गुरुद्वारा दर्शन, पाठ, पूजा, अरदास, आरती आणी कथा कार्यक्रम होईल. दुपारी १२ च्या सुमारास श्री चंडी साहेब दशहरा महातमच्या पाठाची समाप्ति करण्यात येईल. गुरुद्वारात इतर काही ठिकाणी मागील दहा दिवसापासून दशहरा महातम पाठ सुरु आहेत. त्याठिकाणी सुद्धा दुपारी समाप्ति आणि लंगरचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ४ वाजता गुरुद्वारातून पारंपरिक दशहरा हल्ला-महला मिरवणूक निघेल. वरील मिरवणुकीत निशानसाहेब, कीर्तन जत्थे, गतका जत्थे, भजन मंडळी, बैंड पथक, गुरुजींचे घोडे, निहंग सिंघांचे दल आणि भाविक सहभागी होणार आहेत. सायंकाळी ५.३० वाजता सुमारास महावीर चौक हल्लाबोल चौक येथे हल्ला कार्यक्रम होईल. सध्या शहरात जवळपास पन्नास हजार भाविकांची उपस्थिती आहे.

## युवा महोत्सवातून सामाजिक जाणीव जोपासा!-जिल्हाधिकारी

### स्वारातीम विद्यापीठ व नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या 'ज्ञानतीर्थ' युवा महोत्सवाची उत्साहात सांगता



नांदेड/प्रतिनिधी-विद्यार्थ्यांनी युवा महोत्सवासोबतच दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी सामाजिक जाणिव जोपासावी. जलसंधारण आणि पाणी बचतीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.राहुल कर्डिले यांनी केले.

कला, संस्कृती आणि सर्जनशीलतेचा आविष्कार घडविणाऱ्या स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ व नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या वतीने आयोजित ज्ञानतीर्थ-२०२६ युवा महोत्सवाची उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. सांगता समारंभात विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा गौरव करण्यासोबतच मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, जलसंधारण, सायबर सुरक्षा आणि व्यक्तिमत्त्व विकास या विषयांवर मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.प्रफुल्ल अग्रवाल, सचिव सौ.शामल पत्की, संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, परीक्षक आणि विविध महाविद्यालयांचे संघ व्यवस्थापक उपस्थित होते. यावेळी बोलतांना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी मराठवाड्यातील पाणीटंचाईचे गांभीर्य अधोरेखित करून विद्यार्थ्यांनी जलसंधारण आणि पाणी बचतीसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. प्रत्येक महाविद्यालयाने पावसाचे पाणी साठवण, भूजल पुनर्भरण आणि जलसंधारणासाठी कृती आराखडा तयार करावा. पाणी बचतीची प्रतिज्ञा केवळ औपचारिक न ठेवता ती दैनंदिन जीवनात आचरणात आणावी, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय सेवा योजना आणि ग्रामविकासाच्या उपक्रमांत सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी सामाजिक प्रश्नांच्या निराकरणासाठी योगदान द्यावे, असेही त्यांनी नमूद केले.

#### सायबर गुन्ह्यांबाबत जागरूक राहा-एसपी

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.नीलभ रोहन यांनी वाढत्या सायबर गुन्ह्यांबाबत सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले. सोशल मीडियावर वैयक्तिक छायाचित्रे आणि माहिती शेअर करताना काळजी घ्यावी. अनोळखी लिंक, संशयास्पद एपीके फाइल्स आणि अनधिकृत ॲप्सपासून दूर राहावे. कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांनाही सायबर सुरक्षेबाबत जागरूक करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

#### गरुडाप्रमाणे ध्येय गाठा-डॉ.चासकर

विद्यार्थ्यांनीही गरुडाप्रमाणे पंखांत बळ, मनात जिद्द आणि डोळ्यांसमोर निश्चित ध्येय ठेवून यशाची उंच भरारी घ्यावी असे आवाहन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले. यावेळी त्यांनी महोत्सवातील विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले. प्रत्येक महाविद्यालयाने वर्षभर सांस्कृतिक आणि कलात्मक स्पर्धांचे आयोजन केल्यास विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला सातत्याने वाव मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

#### स्वप्नांना पंख द्या-शामल पत्की

संस्थेच्या सचिव शामल पत्की यांनी विद्यार्थ्यांमधील प्रतिभा आणि स्वप्ने साकार करण्याची जिद्द यांचे कौतुक केले. आयुष्यात प्रत्येक गोष्ट परिपूर्ण असेलच असे नाही; मात्र उणिवांपेक्षा सकारात्मक बाबींकडे लक्ष देऊन पुढे जाण्याची वृत्ती यशासाठी महत्त्वाची असते. स्पर्धेत यशापयशापेक्षा पान ४ वर



काँग्रेस पक्षाने मत वाचवा देश वाचवा व्यापक जनसंपर्क अभियाना अंतर्गत सिडको येथे अभियानाचे उद्घाटन काँग्रेसचे सहप्रभारी रेहाना चिश्ती, डॉ.स्मिता शहापुरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, डॉ. यशपाल भिंगे, माजी महापौर अब्दुल सत्तार, ॲड.सुरेंद्र घोडजकर, डॉ.रेखा चव्हाण, धनराज राठोड, आनंद चव्हाण, अनिल मोरे, आनंदराव गुंडीले, महेश देशमुख, बापूसाहेब पाटील, अजिज कुरेशी यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## गुरुद्वारा बोर्ड दोन आठवड्यात बहाल करण्याचे न्यायालयाचे आदेश

### दिवाळीपुर्वी होऊ शकते पुनर्बहाल

नांदेड/प्रतिनिधी-येथील धार्मिक संस्था गुरुद्वारा तख्त सचखंड बोर्ड पुनर्गठित करुन जुने बोर्ड बहाल करण्यात यावे असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने एका याचिकेवर सुनावणी करतांना दिले आहेत. तसेच राज्याचे पालक सचिव यांना न्यायालयात उपस्थित राहण्यास सूचना करण्यात आल्या आहेत. अशी माहिती गुरुद्वारा सचखंड बोर्डाचे माजी सचिव रविंद्रसिंघ बुंगई यांनी येथे दिली आहे.

मा. उच्च न्यायालय खंडपीठाचे न्यायाधीश मा. वैशाली पाटिल-जाधव आणी संदीपकुमार सी. मोरे यांनी दि.१४ ऑक्टोबर २०२६ रोजी अवमान याचिकेवर सुनावणी दरम्यान दिले आहेत. मागील गुरुद्वारा बोर्ड पुनर्बहाल करण्याविषयी कड़क निर्देश दिले. न्यायालयाचे निर्देश दिले आहेत. वरील निर्णय दि.२८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत घेण्याविषयी शासनाने पाउले उचलावी. तसेच पालक सचिव महाराष्ट्र शासन यांनी स्वतः उपस्थित राहून आपले म्हणणे सादर करावे असे निर्देश दिले आहे. मागील गुरुद्वारा बोर्डाचा कार्यकाळ पूर्ण झाला नाही. कोविड संक्रमण कालावधित बोर्ड कार्य करू शकला नाही. त्यामुळे मागील बोर्डास पुन्हा बहाल करण्यात यावे असा आग्रह याचिकाकर्ता स. रविंद्र सिंघ बुंगाई यांचा होता. यापुर्वी न्यायालयाने बोर्ड पुनर्बहाल करण्यासाठी शासनास आदेश दिले होते. पण शासनाकडून चालढकल करुन शीख समाजाला प्रतिनिधित्वापासून दूर ठेवण्यात येत आहे असे याचिकाकर्ते स.रवींद्रसिंघ बुंगई यांनी आपल्या याचिकेत म्हटले होते. याचिकाकर्ता तर्फे ॲड.राजेंद्र देशमुख, ॲड.विशाल चव्हाण, ॲड. कुणाल काळे यांनी युक्तिवाद केला. तर शासनातर्फेॲड. ए. बी. गिरासे यांनी बाजू मांडली.




## पीपल्स हायस्कूलच्या नव्या वास्तूतून भविष्याची नवी भरारी!

स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाड्यात शिक्षणाच्या सुविधा अत्यंत मर्यादित होत्या. माध्यमिक आणि उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना पुणे किंवा हैदराबाद येथे जावे लागत असे. अशा परिस्थितीत परमपूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांनी नांदेडमध्ये शिक्षणप्रसाराचे कार्य हाती घेतले. नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून पीपल्स कॉलेज, सायन्स कॉलेज आणि पीपल्स हायस्कूल यांसारख्या संस्था उभ्या राहिल्या. त्याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी औरंगाबाद येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून मराठवाड्यातील तरुणांसाठी उच्च शिक्षणाची दारे खुली केली. या महान व्यक्तिमत्त्वांच्या दूरदृष्टीने मराठवाड्याच्या शैक्षणिक परिवर्तनाचा पाया घातला.

गोकुळनगर परिसरातील पीपल्स हायस्कूल ही याच गौरवशाली परंपरेचा महत्त्वाचा भाग आहे. संस्थेचे पहिले अध्यक्ष परमपूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्यापासून सुरू झालेली नेतृत्वाची परंपरा पद्मश्री गोविंदभाई श्रॉफ आणि माजी खासदार डॉ. व्यंकटेश काब्दे यांसारख्या मान्यवरांनी समृद्ध केली. आता ही परंपरा सीए डॉ. प्रवीण पाटील यांच्या नेतृत्वातून पुढे जात आहे. संस्थेच्या विकासासाठी विविध पिढ्यांतील नेतृत्वाने दिलेले योगदान तिच्या वाटचालीतील महत्त्वाचा ठेवा आहे.

या परंपरेत सदाशिवराव पाटील यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. त्यांनी दीर्घकाळ संस्थेचे सचिव म्हणून कार्य केले. संस्थेच्या विस्तारासाठी आणि शैक्षणिक विकासासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी जपलेली संस्थानिष्ठा आणि कार्याची परंपरा आजही प्रेरणादायी आहे.

पीपल्स हायस्कूलने केवळ



**स.नौनिहालसिंघ जहागीरदार**
अध्यक्ष,शालेय समिती,
पीपल्स हायस्कूल,नांदेड.

विद्यार्थ्यांना शिक्षण दिले नाही, तर गुणवत्तेचे अनेक विक्रमही प्रस्थापित केले. जुन्या काळातील दहावीच्या गुणवत्ता यादीत शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी स्थान मिळविले. साठे आडनावाच्या विद्यार्थ्याने राज्यात प्रथम क्रमांक मिळविल्याचा अभिमानास्पद विक्रमही शाळेच्या शैक्षणिक इतिहासात नोंदला गेला. विविध क्षेत्रांत कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांनी संस्थेचा लौकिक वाढविला आहे.काळानुसार शिक्षणाच्या गरजा बदलल्या आहेत. आधुनिक शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शाळेची नवीन वास्तू उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष प्रविण पाटील यांचा पीपल्स हायस्कूलची नवी अद्यावत इमारत हा महत्वांकाक्षी प्रकल्प आहे. तो पूर्णत्वास जात आहे याचा मला अभिमान आहे. शालेय समितीचा अध्यक्ष म्हणून ही जबाबदारी पार पाडताना माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि हितचिंतकांचे सहकार्य लाभले. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांतून या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला बळ मिळाले. शाळेच्या विकासासाठी समाजातील विविध घटकांनी दाखविलेली आत्मीयता ही संस्थेच्या कार्याची खरी पावती आहे.

मुख्याध्यापक प्रशांत चौधरी आणि त्यांचे सहकारी शिक्षक शाळेच्या विकासासाठी परिश्रम घेत आहेत. संस्थेच्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी जपलेली विकासाची परंपरा पुढे नेण्याचा आमचा प्रयत्न आहे. प्रस्तावित पाच मजली इमारत विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणारे आधुनिक ज्ञानमंदिर ठरेल, असा विश्वास आहे. दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर २० ऑक्टोबर रोजी नवीन वास्तूचा भूमिपूजन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा केवळ पान २ वर

## पाणी आटले,नियोजन कुठे आटले?

महाराष्ट्रात पावसाचे गणित बिघडले की सर्वप्रथम संकटात सापडतो तो शेतकरी. त्यानंतर ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होतो आणि हळूहळू पाणीटंचाईचे चटके शहरांनाही बसू लागतात. मात्र, पाण्याचे संकट निर्माण झाल्यानंतरच प्रशासनाला जाग येत असेल, तर प्रश्न केवळ निसर्गाचा राहत नाही; तो सरकारच्या दूरदृष्टीचा आणि नियोजनाचा बनतो. पाणी आटले, पण त्यासोबत नियोजनही आटले आहे काय? महाराष्ट्रात धरणे आहेत, नद्या आहेत, जलसंधारणाच्या योजना आहेत, पाणी पुरवठ्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च होतो. तरीही अनेक गावांना टँकरची प्रतीक्षा करावी लागते, शेतकऱ्यांना पिके वाचवण्यासाठी आकाशाकडे पाहावे लागते आणि नागरिकांना पाण्याच्या वेळापत्रकानुसार आपले दैनंदिन जीवन आखावे लागते. मग इतक्या वर्षांच्या योजनांचे फलित नेमके काय? पाणी साठवण्यापेक्षा पाणीटंचाईनंतर उपाययोजना करण्यावरच प्रशासनाचा भर असेल, तर या व्यवस्थेच्या प्राधान्यक्रमांची चिकित्सा करावीच लागेल. पावसाचे पाणी वाहून जाते, भूजलाची पातळी खालावते, अनेक ठिकाणी पाण्याचा उपसा वाढतो आणि उपलब्ध जलसाठ्यांचे नियोजन विस्कळीत होते. पाणलोट क्षेत्र विकास, शेततळी, बंधारे, जलपुनर्भरण, सांडपाण्याचा पुनर्वापर आणि पिकांच्या पद्धतीत बदल यांसारख्या उपायांची चर्चा दरवर्षी होते. परंतु या उपायांची अंमलबजावणी किती झाली, त्यातून किती पाणी वाचले आणि त्याचा लाभ किती गावांना झाला, याचा हिशेब जनतेसमोर येणे आवश्यक आहे. योजनांची नावे आणि खर्चाची आकडेवारी म्हणजे पाणी सुरक्षिततेची हमी नव्हे. शहरांमध्ये गळतीमुळे वाया जाणारे पाणी, अनियंत्रित वापर आणि पाण्याचे असमान वितरण हे प्रश्नही दुर्लक्षित करता येणार नाहीत. एका बाजूला काही भागांत पाण्याची नासाडी होत असताना दुसऱ्या बाजूला नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असेल, तर ही केवळ टंचाई नाही; ती व्यवस्थापनातील विषमता आहे. पाण्याचे नियोजन करताना उद्योग, शेती आणि घरगुती वापर यांच्यात समतोल राखणे गरजेचे आहे. त्यातही पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य मिळाले पाहिजे. दुष्काळ जाहीर करणे, टँकर सुरू करणे आणि तात्पुरत्या मदतीच्या घोषणा करणे या उपायांची गरज नाकारता येत नाही. पण प्रत्येक संकटानंतर पुन्हा त्याच उपायांवर अवलंबून राहणे म्हणजे कायमस्वरूपी तोडगा शोधण्यातील अपयशच. पावसाचे पाणी गावागावांत अडवणे, जलसाठ्यांचे शास्त्रीय व्यवस्थापन करणे, भूजल उपशावर नियंत्रण ठेवणे आणि पाणी वापराचे लेखापरीक्षण करणे यासाठी ठोस कालबद्ध कार्यक्रम हवा.पाण्याचा प्रश्न हा केवळ जलसंपदा विभागाचा नाही. तो कृषी, ग्रामविकास, नगरविकास आणि पर्यावरणाशीही जोडलेला आहे. त्यामुळे विभागीय समन्वय, स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी आणि नागरिकांचा सहभाग यांशिवाय जलसुरक्षेचे स्वप्न पूर्ण होणार नाही. प्रत्येक गावाचा जलहिशेब आणि प्रत्येक शहराचा पाणीहिशेब सार्वजनिक झाला पाहिजे. पाऊस आपल्या हातात नाही; पण पडलेल्या पावसाचे पाणी साठवणे, त्याचा काटकसरीने वापर करणे आणि भविष्यातील टंचाई टाळणे हे निश्चितच आपल्या हातात आहे. निसर्गाला दोष देऊन सरकारची जबाबदारी संपत नाही. पाणीटंचाईच्या काळात टँकर धावतात; पण खरी कसोटी टँकर किती पाठवले याची नसून पुढच्या वर्षी टँकरची गरज किती कमी झाली याची आहे.पाणी आटल्यावर धावपळ करण्यापेक्षा पाणी असतानाच नियोजन करण्याची बुद्धी प्रशासनाला कधी येणार? प्रत्येक उन्हाळ्यात पाण्यासाठी संघर्ष आणि प्रत्येक पावसाळ्यात नव्या आश्वासनांची पुनरावृत्ती हेच महाराष्ट्राचे भवितव्य असू शकत नाही. पाण्याचे संकट गंभीर आहे; पण त्याहून गंभीर संकट म्हणजे उपलब्ध पाण्याचे व्यवस्थापन करण्यात आपण वारंवार अपयशी ठरणे. आता घोषणांचा नव्हे, तर पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा हिशेब देण्याचा काळ आला आहे.

# युवक महोत्सवात आंबेडकरी जलशातून समतेचा जागर



नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सायन्स कॉलेज, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ज्ञानतीर्थ२०२६ आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी सांस्कृतिक कलाविष्कारांसह वैचारिक स्पर्धांनी रंगत आणली. साने गुरुजी मंचावर सादर झालेल्या आंबेडकरी जलशातून सामाजिक समता, शिक्षण, बंधुता आणि परिवर्तनाचा जागर करण्यात आला, तर पंकज उदास मंचावर रंगलेल्या वादविवाद स्पर्धेत सोशल मीडियाच्या सकारात्मक आणि नकारात्मक परिणामांवर विद्यार्थ्यांनी परखड मते मांडत वैचारिक मंथन घडवून आणले. यासोबतच समूहगायन, मृदमुर्तिकला, रांगोळी आणि भारतीय शास्त्रीय नृत्याच्या सादरीकरणांनी महोत्सवाच्या सांस्कृतिक वैभवात भर घातली.

साने गुरुजी मंचावर सादर झालेल्या आंबेडकरी जलशाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. वंदन भीमरायाला आणि काव्यसुमने उधळीत आलो भीमरायावरी यांसारख्या गीतांतून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचा गौरव करण्यात आला. पारंपरिक शाहिरी बाणा, ढोलकीची दमदार थाप आणि प्रभावी आवाजाच्या साथीने सादर झालेल्या या जलशातून समता, शिक्षण, बंधुता आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश देण्यात आला. शाहिरीच्या ओजस्वी सादरीकरणामुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. पंकज उदास मंचावर सोशल मीडिया:ज्ञानाचे वैश्विक भांडार की गुलामगिरीचे साधन? या विषयावर आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या उपयुक्ततेसह त्याच्या अतिवापरातून निर्माण होणाऱ्या समस्यांवरही प्रभावीपणे भाष्य केले.

सोशल मीडिया हे ज्ञानप्राप्ती, संशोधन, ई-लर्निंग, कौशल्यविकास आणि जागतिक घडामोडींची माहिती मिळविण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे मत अनुकूल बाजूच्या वक्त्यांनी मांडले. सामाजिक चळवळींना व्यापक स्वरूप देणे, जनजागृती करणे आणि जगभरातील माहिती एका क्लिकवर उपलब्ध करून देणे, ही सोशल मीडियाची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.दुसरीकडे, सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे व्यसनाधीनता, वेळेचा अपव्यय, खोट्या बातम्यांचा प्रसार, सायबर गुन्हे, नैराश्य आणि प्रत्यक्ष मानवी संवादातील घट यांसारख्या गंभीर समस्यांकडे प्रतिकूल बाजूच्या वक्त्यांनी लक्ष वेधले. तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर केल्यास ते प्रगतीचे प्रभावी साधन ठरू शकते; मात्र त्याच्या आहारी गेल्यास व्यक्तीच्या विचारस्वातंत्र्यावर आणि मानसिक स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असा महत्त्वपूर्ण मुद्दाही या चर्चेतून पुढे आला.

या स्पर्धेत एमआयटी महाविद्यालय, वसमत येथील गंगाप्रसाद चव्हाण व गायत्री लालपोतू, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर येथील वैष्णवी मोरे व आरती मंडाळे, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत येथील सम्राट सरोदे व प्रगती जाखणका यांनी सहभाग घेतला. तसेच सायन्स कॉलेज, नांदेड येथील शिवराज काळे व शेजल नरवाडे, केकेएम महाविद्यालय, मानवत येथील अपेक्षा बी. निर्वळ व महेश जी. लांडगे, तसेच दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर येथील कल्पना कवळे व ऋतुजा लाडके यांनीही आपापली मते प्रभावीपणे मांडली. श्रीराम लागू मंचावर आयोजित भारतीय समूहगायन स्पर्धेत विविध महाविद्यालयांच्या संघांनी सुरेल सादरीकरणातून उपस्थितांची दाद मिळवली. समूहगायनातील स्वरांचा मेळ, सादरीकरणातील समन्वय आणि संगीताविष्कारातून विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांची प्रचिती दिली.

स्मिता पाटील मंचावर आयोजित मृदमुर्तिकला स्पर्धेत कुटुंब ही संकल्पना देण्यात आली होती. या विषयावर आधारित कलाकृती साकारण्यासाठी ३२ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. मातीच्या माध्यमातून कुटुंबातील नातेसंबंध आणि भावविश्व साकारण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला.यानंतर भारतीय उत्सव या संकल्पनेवर आधारित रांगोळी स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत ५५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. भारतीय संस्कृती, विविध सण आणि परंपरा यांचे दर्शन घडविणाऱ्या आकर्षक रांगोळ्यांमधून विद्यार्थ्यांची कल्पकता आणि कलात्मकता खुलून आली. रंगांच्या सुरेख मांडणीतून भारतीय संस्कृतीचे वैविध्य आणि परंपरांचे सौंदर्य उलगडले.नाना पाटेकर मंचावर आयोजित भारतीय शास्त्रीय नृत्य स्पर्धेत ताल, लय, मुद्राभिनय आणि पदन्यास यांच्या सुरेख संगमातून भारतीय नृत्यपरंपरेचे दर्शन घडले. यशवंत महाविद्यालयाची रुद्रानी मोरे हिने शंकर वंदना या शास्त्रीय नृत्यप्रकाराचे प्रभावी सादरीकरण करून प्रेक्षकांची दाद मिळवली. तिच्या सादरीकरणामुळे युवक महोत्सवाच्या सांस्कृतिक वातावरणात अधिकच रंगत आली.

युवक महोत्सवाच्या विविध मंचांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. सूर्यकांत जोगदंड, डॉ. डी. एन. मोरे, युवक महोत्सवाचे संयोजक तथा स्वागताध्यक्ष डॉ. प्रवीण पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष प्रफुल्ल अग्रवाल, सहसचिव ड. प्रदीप नागापूरकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, अधिसभा सदस्य डॉ. महेश मगर, डॉ. ए. टी. शिंदे, युवराज पाटील, प्राचार्य एल. पी. शिंदे, संयोजक सहसचिव डॉ. प्रशांत सुतकर, शशिमोहन नंदा, डॉ. डी. आर. मुंढे, डॉ. अविनाश घाडगे, आकाश करंडे यांच्यासह संयोजन समितीचे सदस्य डॉ. ज्ञानदेव राऊत, डॉ. गणेश जोशी, डॉ. शंकर विभुते, महाविद्यालयांतील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खचलेल्या नवदुर्गेला मिळाले संघर्षाचे बळ!

## शिक्षणदृष्टी केंद्राचा माणुसकीचा जागर;शारदाला दर्जेदार शिलाई मशीनची भेट

उमरखेड/प्रतिनिधी-नवरात्र म्हणजे नऊ दुर्गांची उपासना! मंदिरातील देवीला फुले वाहण्यापेक्षा, समाजातील खऱ्या, खचलेल्या दुर्गेला आधार देऊन तिला पुन्हा उभे करणे, हीच खरी नवरात्र आहे. हाच विचार कृतीत आणत शिक्षणदृष्टी केंद्राने माणुसकीचा जागर घडवला आहे.

विडूळ येथील झोपडपट्टीत राहणारी शारदा...दोन वर्षांपूर्वी पतीचे छत्र हरवले. चार चिमुकल्या मुलांच्या संगोपनाची आणि शिक्षणाची सगळी जबाबदारी तिच्या एकटीच्या खांद्यावर येऊन पडली. दिवसा उन्हातान्हात शेतमजुरी, आणि रात्री उशिरापर्यंत जुन्या, मोडकळीस आलेल्या शिलाई मशीनवर टाके घालत मुलांचे भविष्य



शिवण्याची तिची धडपड सुरू होती.हीच वेदना शिक्षक नागेश मिराशे यांच्या लक्षात आली. त्यांनी ही गोष्ट शिक्षणदृष्टी केंद्राच्या ग्रुपवर मांडली आणि चमत्कार झाला.

मदतीच्या एका आवाहनावर केंद्राच्या सदस्यांनी तात्काळ प्रतिसाद दिला. काही तासांतच १० हजार रुपयांचा निधी जमा झाला. दुसऱ्याच दिवशी शारदाच्या गरजेनुसार एकदम नवं, दर्जेदार शिलाई मशीन आणि लागणारे सर्व साहित्य खरेदी करण्यात आले. त्यानंतर सर्व सदस्य थेट शारदाच्या झोपडीवजा घरी पोहोचले. अनपेक्षितपणे हातात आलेल्या नव्या मशीनकडे पाहून शारदाच्या डोळ्यात अश्रू तरळले. हे अश्रू दुःखाचे नव्हते, तर स्वावलंबनाची नवी वाट सापडल्याच्या आनंदाचे होते. यावेळी सदस्यांनी तिच्या मुलांना रोज शाळेत पाठवण्याची समजूत घातली आणि त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेण्याचे आश्वासनही दिले.

> **मागे राहिलेल्या महिलेची फरफट अधिक होते!**
> पुरुष आत्महत्या करतो; पण त्याच्यानंतर मागे राहिलेल्या महिलेची खरी फरफट होते. या मदतीमुळे एक खचलेली दुर्गा नव्याने, हिमतीने उभी राहण्यास हातभार लागेल. तिच्या मुलांच्या शिक्षणालाही बळ मिळेल. हीच आमची खरी नवरात्र!
> - **डॉ.सचितानंद बिचेवार,**
> संस्थापक, शिक्षणदृष्टी केंद्र विडुळ

एका शिलाई मशीनने आज शारदाला फक्त रोजगार दिला नाही, तर तिच्या मुलांच्या उज्ज्वल भविष्याची नवी वाट खुली केली आहे. ऐन नवरात्रोत्सवात एका संघर्षशील नवदुर्गेला पुन्हा उभे करण्याचे बळ मिळाल्याने सर्व सदस्यांनी समाधान व्यक्त केले. या उपक्रमासाठी संस्थेचे संस्थापक डॉ. सचितानंद बिचेवार, अध्यक्ष राहुल गाजेवार, सचिव नागेश मिराशे, किशोर डांगे, शिवाजी हिंगमिरे, परमेश्वर बोन्सले, शिवा हिंगमिरे, अनिल सगमे, विठ्ठल बोन्सले, अशोक बिचेवार, स्वप्निल बिचेवार, गोविंद गांजरे, नितीन नाग्रपवाड, सुधाकर मुलंगे यांच्यासह अनेकांनी पुढाकार घेतला.

# स्त्रीच्या कर्तृत्वाला आणि विचारांना समान प्रतिष्ठा देणे ही काळाची गरज-प्रा.बकवाड

कंधार/प्रतिनिधी-स्त्रीशक्तीचा खरा गौरव तिच्या शिक्षणात, स्वातंत्र्यात, स्वावलंबनात आणि निर्णयक्षमतेत आहे. स्त्रीला केवळ पूजेचे प्रतीक न मानता तिच्या कर्तृत्वाला आणि विचारांना समान प्रतिष्ठा देणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन दि.१८ रोजी प्रा. सारिका बकवाड यांनी केले. त्या कंधार तालुक्यातील फुलवळ येथे दुर्गामहोत्सवाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या.

यावेळी स्त्रीशिक्षण, स्वावलंबन, सक्षमीकरण, स्त्री-पुरुष समानता आणि अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर समाजप्रबोधनपर व्याख्यानात



प्रा.बकवाड यांनी आपल्या वाणीतून परखडपणे प्रभावी विचार मांडतांना देवीची आराधना करताना समाजातील स्त्रीला समानतेचा आणि सन्मानाचा अधिकार देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. स्त्री आणि पुरुष हे समाजाचे समान हक्काचे भागीदार असून, समान हक्क आणि समान संधी ही सुदृढ समाजव्यवस्थेची पायाभूत तत्त्वे आहेत. स्त्री-पुरुष समानता केवळ विचारांत नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीत उतरली पाहिजे. मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य, महिलांना आर्थिक स्वावलंबनाची संधी आणि त्यांच्या निर्णयांचा आदर यातूनच खऱ्या अर्थाने सक्षमीकरण साध्य होईल, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी-परंपरा आणि विवेकहीन विचारांवरही परखड भाष्य केले. श्रद्धेच्या नावाखाली विवेकाला तिलांजली न देता वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे, प्रश्न विचारण्याची वृत्ती जोपासणे आणि मानवतावादी मूल्यांना महत्त्व देणे हेही तेवढेच आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. उत्सव केवळ परंपरा जपण्यासाठी नव्हे, तर समाजाच्या विचारांना नवी दिशा देण्यासाठीही असावेत, असा प्रबोधनपर संदेश त्यांच्या व्याख्यानातून देण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन रोकडेश्वर दुर्गा मंडळ यांच्या वतीने करण्यात आले होते. धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक समता, विवेकवाद आणि स्त्रीसन्मानाचे विचार जनमानसापर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमातून प्रयत्न करण्यात आला. यावेळी गावातील लहान, थोर, महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

## पीपल्स हायस्कूलच्या...

इमारतीच्या उभारणीचा प्रारंभ नसून संस्थेच्या इतिहासातील नव्या पर्वाची सुरुवात आहे. या वास्तूतून हजारो विद्यार्थ्यांची स्वप्ने आकाराला येतील, शिक्षकांच्या प्रयत्नांना नवी दिशा मिळेल आणि संस्थेची शैक्षणिक परंपरा अधिक समृद्ध होईल.शैक्षणिक संस्थेचे खरे वैभव तिच्या इमारतीच्या उंचीत नसते, तर तिथून घडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वात असते. मात्र, त्या कर्तृत्वाला नवी उंची गाठण्यासाठी सक्षम पायाभूत सुविधा आणि समाजाचे सहकार्य आवश्यक असते. पीपल्स हायस्कूलची नवी वास्तू या दोन्हींचा सुंदर संगम ठरावी, हीच अपेक्षा. या ऐतिहासिक उपक्रमात सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. शाळेचे आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संस्थेचे पदाधिकारी आणि हितचिंतक यांनी भूमिपूजन सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करतो. स्वामी रामानंद तीर्थ यांनी पेटविलेली ज्ञानज्योत पुढील पिढ्यांपर्यंत अधिक तेजाने पोहोचविणे, हाच या नव्या वास्तूच्या उभारणी मागील खरा संकल्प आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# एनसीएमसी कार्डमुळे एसटी चालकांची डोकेदुखी वाढली

देगलूर/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून प्रवास करणाऱ्या महिला व जेष्ठ नागरिकांना सवलतीचा लाभ मिळावा, यासाठी एलसीएमसी कार्डची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र या कार्डमुळे पुरेशी रक्कम नसणे, नेटवर्कची समस्या आणि पैसे भरण्याच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणीमुळे एसटी चालकांची डोकेदुखी वाढली आहे. अनेक बस मध्ये कार्ड मधील शिल्लक रकमेवरून प्रवासी आणि चालक यांच्यात वाद होत असल्याने या यंत्रणेत सुधारणा करण्याची मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसमध्ये ७५ वर्षे व त्यावरील जेष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची सुविधा, तर महिला आणि इतर पात्र जेष्ठ नागरिकांना नियमानुसार प्रवास भाड्यात सवलत दिली जाते. सवलतीचा लाभ योग्य प्रवाशांनाच मिळावा, या उद्देशाने एनसीएमसी कार्डचा वापर सुरू करण्यात आला आहे. मात्र, प्रवासादरम्यान कार्ड मध्ये तिकिटासाठी आवश्यक के रक्कम उपलब्ध नसल्यास अडचणी निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. कार्ड मध्ये पैसे नसल्यास चालकांनी रक्कम भरण्यासाठी मदत करावी, अशी अपेक्षा असली तरी प्रत्यक्षात नेटवर्क उपलब्ध नसणे किंवा इंटरनेट सेवा खंडित होणे यामुळे व्यवहार पूर्णपणे कठीण ठरते. ग्रामीण भागात ही समस्या अधिक जाणवत असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत प्रवाशांना समजावून सांगणे, कार्ड मधील व्यवहार पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे आणि त्याच वेळी बस वेळेत पुढे नेणे, अशी दुहेरी जबाबदारी चालकावर येते. काही प्रसंगी कार्डमध्ये पैसे नसतानाही सवलतीच्या मुद्द्यावरून महिला व जेष्ठ प्रवाशासोबत चालकांची वाद होत असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे चालकावर मानसिक ताण वाढत असून, कर्तव्य बजावताना त्यांना अडचणीचा सामना करावा लागत आहे.

# ब्राऊन शुगर विक्री करणाऱ्या दोन जणांना अटक



नांदेड/प्रतिनिधी-शहरातील विवेकनगर भागात ब्राऊनशुगरची विक्री करणाऱ्या दोन जणांना स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी रविवारी अटक केली आहे.

नांदेड शहर व परिसरात अंमली पदार्थाची सर्रासपणे विक्री केली जात असून असंख्य तरुण नशेच्या आहारी जात असल्याची ओरड अनेक दिवसांपासून सुरु होती. अंमली पदार्थाच्या विक्री संदर्भात लोकप्रतिनिधींनीही तक्रारी केल्या होत्या. शहरातील विवेकनगर भागात दोन तरुण ब्राऊनशुगर विक्री करीत असल्याची गुप्त माहिती पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांना मिळाली. त्यांनी त्वरीत कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागास दिली. पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या नेतृत्वाखाली तसेच भाग्यनगर पोलीस स्टेशनच्या सहकार्याने सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे, फौजदार बळीराम दासरे व पोलीस कर्मचाऱ्यांनी रविवारी दुपारी विवेकनगर भागातील आशिष किराणा दुकानाजवळ छापा टाकला. गुरबिरसिंघ हरपालसिंघ संधु (वय ५०) रा.तरणतारण (पंजाब) ह.मु.श्रीनगर,नांदेड व जनार्दन गोविंदराव सोनटक्के (वय ३०) रा.ब्राह्मणवाडा, नांदेड यांना अटक केली. पोलीसांनी राजपत्रीत अधिकारी व शासकीय पंचासमक्ष दोन जणांची अंगझडती घेतली असता त्यांच्या जवळून ६२ ग्रॅम ब्राऊनशुगर (चिट्टा) किंमत ३ लाख १० हजार रुपयाचे जप्त करण्यात आले. ब्राऊनशुगर संदर्भात आरोपींकडे कसून चौकशी केली असता त्यांनी सदरील ब्राउन शुगर पंजाबमधील दोन इसमाकडून खरेदी करुन नांदेडला विक्री करण्यासाठी आणल्याचे सांगीतले. याप्रकरणी आरोपी विरुध्द भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पंजाबमधून ब्राऊनशुगर नांदेडमध्ये आणुन विक्री करण्याचा प्रकार अनेक दिवसांपासून सुरु होता.

# अष्टमीला नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांच्याकडून भाविकांना फराळाचे वाटप

माहूर/प्रतिनिधी-महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र माहूरगडावर नवरात्रोत्सवा निमित्त रविवारी (ता. १८) अष्टमीच्या पावन पर्वावर भाविकांची मोठी गर्दी उसळली असताना, त्यांच्या सेवेसाठी नगराध्यक्ष फिरोज भैय्या दोसानी यांनी पुढाकार घेतला. स्वर्गीय आ.प्रदीप नाईक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या वतीने भाविकांना फराळ, केळी आणि पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात आले. धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने माणुसकी, बंधुभाव आणि सामाजिक एकतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे भाविकांकडून कौतुक होत आहे.

माहूरच्या नवरात्रोत्सवात राज्याच्या विविध भागांतून लाखो भाविक श्री रेणुका मातेच्या दर्शनासाठी येतात. या भाविकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, त्यांना स्वच्छता, पिण्याचे पाणी, पार्किंग आणि आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी नगराध्यक्ष फिरोज भैय्या दोसानी प्रयत्नशील आहेत. नवरात्रोत्सवाच्या प्रारंभापासून सांगतेपर्यंत भाविकांसाठी बाटलीबंद पिण्याच्या पाण्याची व्यवस्था



करण्यात आली असून, अष्टमीच्या दिवशी फराळ आणि केळींचे वाटप करून सेवाकार्याला आणखी एक पाऊल पुढे नेण्यात आले. मजहब नहीं सिखाता आपस में बैर रखना या विचाराला कृतीतून अधोरेखित करणारा हा उपक्रम माहूरच्या सर्व धर्मसमभावाच्या परंपरेचे दर्शन घडवतो. मुस्लिम समाजातील लोकप्रतिनिधी असलेल्या फिरोज भैय्या दोसानी यांनी नवरात्रोत्सवात देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सेवेला प्राधान्य दिल्याने धार्मिक सलोखा आणि परस्पर आदराचा सकारात्मक संदेश समाजात पोहोचत आहे. धर्म, जात आणि पंथ यापलीकडे जाऊन माणुसकी जपणे, हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.नगराध्यक्ष म्हणून फिरोज भैय्या दोसानी हे नवरात्रोत्सवाच्या काळात नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून भाविकांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडवित आहे. शहरातील स्वच्छता, वाहतूक नियोजन, वाहनतळ आणि पिण्याच्या पाण्यासह आवश्यक सुविधांवर विशेष लक्ष दिले जात आहे. या कामात नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विवेक कांदे आणि कर्मचारीही समन्वयाने काम करत आहेत. स्वर्गीय आमदार प्रदीपजी नाईक यांच्या स्मृतींना उजाळा देत भाविकांच्या सेवेसाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवणारा ठरला आहे.

# दसऱ्यानिमित्त संघाचे आठ ठिकाणी संचलन

नांदेड/प्रतिनिधी-राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने दसऱ्याच्या निमित्त मंगळवारी, दि.२० रोजी नांदेड शहरात आठ ठिकाणी संचलन आणि विजयादशमी उत्सवाचा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती शहर कार्यवाह मारोती कमळापुरे यांनी दिली. कौठा भागातील बसवेश्वरनगरमधील हनुमान मंदिरापासून दि.२० रोजी स.७ वा. संचलन निघणार आहे. कौठा भागातील सौभाग्य मंगल कार्यालयापासून स.७.३० वा., सिडकोतील श्री स्वामी समर्थ केंद्र येथून सकाळी ७.१५ वाजता, यशवंतनगरातील श्रीराम मंदिर येथून सकाळी ७.३० वाजता, वामनराव पावडे मंगल कार्यालय येथून स.७.१५ वा., सोमेश कॉलनीतील नेहरु शाळेपासून स.७.३० वा. आणि हनुमानगड मैदान येथून स.७.१५ वा. संघाच्या स्वयंसेवकांचे पथसंचलन निघणार आहे. तरी त्या-त्या भागातील संघप्रेमींनी आपापल्या भागात रांगोळ्या काढून, पुष्पवृष्टी करुन पथसंचलनाचे स्वागत करावे, असे आवाहन कमळापुरे यांनी केले आहे.

# पिण्याच्या पाण्याचा साठा राखून उरलेले पाणी शेतीला देण्याची मागणी



मांडवी/प्रतिनिधी-किनवट तालुक्यातील मौजे मांडवी आणि शिरपूर येथील तलावांमध्ये सध्या ९५ टक्के जलसाठा शिल्लक असून, पिण्याच्या पाण्याची गरज भागवून उर्वरित पाणी शेतीला उपलब्ध करून देण्याची मागणी येथील शेतकऱ्यांनी केली आहे. या संदर्भात मांडवी परिसरातील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आल्यानुसार, मांडवी आणि शिरपूर तलाव पूर्ण क्षमतेने भरले होते आणि आजही त्यात ९५ टक्के पाण्याचा साठा उपलब्ध आहे. पिण्याच्या पाण्याच्या गरजेबाबत आमचे दुमत नसले, तरी सद्य, दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकऱ्यांची पिके करपून चालली आहेत. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा आवश्यक साठा सुरक्षित ठेवून उरलेले अतिरिक्त पाणी शेतीसाठी सोडण्यात यावे, अशी विनंती शेतकऱ्यांनी केली आहे.तसेच, धरणांवरील शेतकरी पंपांचे वीज कनेक्शन तोडण्याची सुरू असलेली कारवाई तातडीने थांबवावी आणि पिकांना वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना किमान एक महिन्याची मुदत देण्यात यावी, जेणेकरून पिकांना जीवनदायी पाणी देता येईल, अशी आर्त हाक शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिली आहे. या निवेदनावर अविनाश राठोड, जगदीश रेड्डी, कुंदन पवार, नारायण बावणे, सुरेंद्र राठोड, प्रवीण राठोड, रवी राठोड, विनोद राठोड, अविनाश चव्हाण, नवीन राठोड, सुरेश राठोड, शिवकुमार ठाकूर, शंकर राठोड, पवन जाधव, कल्पना राठोड, नंदू राठोड, गजानन आंबेकर, गजानन बांडेवार, आकाश निलकँठवार यांच्यासह परिसरातील शेतकऱ्याच्या स्वाक्षऱ्या आहे.युवा नेते शैलेश राठोड यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळने नांदेड जिल्हाधिकाऱ्याला निवेदन दिले आहे.

# महिला काँग्रेसच्या ओबीसी राज्य सहसंयोजकपदी ललिता कुंभार यांची नियुक्ती



नांदेड/प्रतिनिधी-अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागांतर्गत महाराष्ट्र प्रदेश ओबीसी काँग्रेस महिला विभागाच्या राज्य सहसंयोजकपदी ललिता भगवान कुंभार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

ओबीसी काँग्रेसचे अध्यक्ष डॉ.अनिल जय हिंद यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आलेल्या नियुक्तीपत्रानुसार, त्यांच्याकडे ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या पदाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ओबीसी महिलांचे संघटन मजबूत करणे, त्यांच्या प्रश्नांवर काम करणे तसेच राज्य आणि जिल्हास्तरावरील संघटनांमध्ये समन्वय साधणे, ही प्रमुख कामे अपेक्षित आहेत. ओबीसी महिलांचे हक्क, कल्याण आणि सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय सक्षमीकरणाच्या मुद्द्यांवरही महिला विभागाच्या माध्यमातून काम केले जाणार आहे. ललिता भगवान कुंभार यांच्या नियुक्तीमुळे महाराष्ट्र प्रदेश ओबीसी काँग्रेस महिला विभागाच्या संघटनात्मक कामकाजात त्यांचा सहभाग राहणार आहे. त्यांच्या नियुक्तीची माहिती संबंधित प्रसिद्धिपत्रकातून देण्यात आली आहे.

## जाहीर प्रगटन

मा.श्री.ए.जी.चव्हाण,६ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,नांदेड
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५९४/२०२६
अंजनाबाई व इतर विरुध्द निरंक

अर्जदार:- १. अंजनाबाई भ्र.श्रीराम गंगलवार वय : ७५ वर्षे, धंदा : घरकाम, २. पांडुरंग पि.श्रीराम गंगलवार वय : ५८ वर्षे, धंदा : नोकरी दोघे रा.वेदांत नगर, नांदेड. मो.९४२१८४०३४४

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदारांनी कायदेशीर वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जदार हे मयत श्रीराम पि.गंगाराम गंगलवार यांचे कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्र.१ ही त्यांची पत्नी व अर्जदार २ हा त्यांचा मुलगा आहे. त्यांचा मृत्यू दिनांक १०/०८/२०२५ रोजी नांदेड येथे झाला, त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र नांदेड महानगरपालिकेने निर्गमित केले असून त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रती प्रस्तुत संचिकेत दाखल करण्यात आलेल्या आहेत. अर्जदाराच्या अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारस नाही, असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदारास शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयीन कामासाठी वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी या जाहिर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार यांना मयत श्रीराम पि.गंगाराम गंगलवार यांचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात दिनांक २७/११/२०२६ पर्यंत किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत हजर राहून आक्षेप नोंदवावा/सादर करावा. या तारखेनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्ज एकतर्फी निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

करिता हे जाहीर प्रगटन आज दिनांक १५/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपिक
६ वे सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

# हदगाव शहरात सिमेंट रस्त्यांच्या कामातील धुळीचा त्रास वाढला

## खोकला,सर्दी अन् ॲलर्जीने बालकांसह नागरिक त्रस्त

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरात विविध भागांत सुरू असलेल्या सिमेंट नाल्या रस्त्यांच्या कामांमुळे धूळ आणि वायू प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनत असल्याचे चित्र दिसून येत आहे. रस्त्यांच्या कामात दगडी डस्टचा मोठ्या प्रमाणात वापर, सुरू असलेले खोदकाम आणि प्रमुख चौकांमधील वाहतूक कोंडी यामुळे नागरिकांना धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे. सर्दी, खोकला, घशाची खवखव आणि ॲलर्जीच्या तक्रारींमुळे बालक व नागरिक हैराण झाले असून, सिमेंट नाली रोडच्या कामाच्या दरम्यान धूळ नियंत्रणाच्या उपाययोजना का केल्या जात नाहीत?, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शहरातील रस्त्यांची कामे सुरू असताना उडणारी धूळ आणि वाहनांच्या धुरामुळे परिसरातील हवेच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याची चिंता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. मात्र, हवेचा गुणवत्ता निर्देशांक वाढल्याची अधिकृत आकडेवारी उपलब्ध नसल्याने त्याबाबत संबंधित यंत्रणांनी प्रत्यक्ष मोजमाप करून वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची गरज आहे. शहरातील उपजिल्हा रुग्णालयामध्ये ओपीडीत दिवसेंदिवस रुग्णांची गर्दी वाढत आहे. या ठिकाणी अपुरा कर्मचारी वर्ग आहे. यात अनेक जागा रिकाम्या असून मुबलक कर्मचारी वर्ग, तज्ञांची आवश्यकता आहे. वैद्यकीय अधीक्षक डॉ. स्वामी यांनी दिलेल्या माहितीनुसार, रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात (ओपीडी) दररोज जवळपास ३०० ते ४०० रुग्ण उपचारासाठी येतात. तथापि, ओपीडीतील एकूण रुग्णसंख्या आणि केवळ धुळीच्या प्रदूषणामुळे होणाऱ्या आजारांची संख्या पण वाढत आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच दमा आणि इतर श्वसनविकार असलेल्या व्यक्तींनी अधिक काळजी घेणे आवश्यक आहे, असे तज्ञांचे मत आहे. धुळीच्या संपर्कामुळे काही व्यक्तींना खोकला, शिंका येणे, नाक वाहणे, डोळ्यांची जळजळ आणि श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो.राठी चौक ते उपजिल्हा रुग्णालय परिसरासह राठी चौक, आझाद चौक, उपजिल्हा रुग्णालय आणि पोलीस स्टेशन परिसरात वाहनांची मोठ्या प्रमाणावर ये-जा सुरू असल्याने धुळीचा प्रश्न गंभीर बनत आहे. या भागांमध्ये रस्त्यांवरील बांधकाम साहित्य, खोदकामातून निर्माण होणारी धूळ आणि वाहनांचा धूर यामुळे नागरिकांना त्रास होत असल्याचे दिसून येते. वाहतूक कोंडीमुळे वाहनांचा वेग मंदावतो आणि परिसरात प्रदूषणाचा त्रास अधिक जाणवतो. रस्त्यांच्या कामांदरम्यान दगडी डस्ट व इतर बांधकाम साहित्य योग्य प्रकारे झाकून ठेवणे, आवश्यकतेनुसार पाण्याची फवारणी करणे, रस्त्यांवरील साचलेली धूळ नियमितपणे साफ करणे आणि बांधकाम स्थळी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे गरजेचे आहे, पण ते संबंधितांकडून दिसून येत नाही. त्याचबरोबर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी योग्य नियोजन करणेही आवश्यक आहे.पण तेही दिसून येत नाही. विकासकामे आवश्यक असली, तरी ती करताना नागरिकांच्या आरोग्याची आणि सुरक्षिततेची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. त्यामुळे हदगाव शहरातील रस्त्यांच्या कामांमध्ये धूळ नियंत्रणाच्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी कधी होणार?, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# मतदानाच्या दिवशी मतदान केंद्र परिसरातील आठवडी बाजार बंद

नांदेड/प्रतिनिधी-औरंगाबाद पदवीधर मतदारसंघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यांमध्ये शहरी व ग्रामीण भागातील एकूण १२० मतदान केंद्रांवर शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. मतदान प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मतदान केंद्र परिसरातील आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले आहेत.

महाराष्ट्र राज्याचे पणन संचालक, पुणे यांनी दिलेल्या निर्देशानुसार मतदानाच्या दिवशी नांदेड जिल्ह्यातील संबंधित १२० मतदान केंद्र परिसरात भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्यात येणार आहेत. तसेच हे आठवडी बाजार अन्य दिवशी भरविण्यास परवानगी देण्यात आली आहे. मार्केट अँड फेअर ॲक्ट, १८६२ मधील कलम ५ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यांतील शहरी व ग्रामीण भागातील १२० मतदान केंद्रांच्या परिसरात दि. २३ ऑक्टोबर रोजी भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. मतदानाच्या दिवशी बंद ठेवण्यात येणारे हे सर्व आठवडी बाजार शनिवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी भरविण्यात यावेत, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# पाच हजारात दिवाळी कशी गोड होणार?

## संतप्त शेतकऱ्यांचा महायुती सरकारला सवाल

देगलूर/प्रतिनिधी-राजासह जिल्हा पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने खरीप हंगाम पूर्णतः वाया गेला. आता रब्बी हंगामासाठी जमिनीत ओलावा नसल्याने पिकांची उगवण होणार नाही. या भीतीमुळे शेतकरी धास्तावला आहे.देगलूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. हाताशी आलेले पीक संकटात सापडल्याने दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यासमोर यंदा दिवाळी साजरी करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजार रुपयांची अग्रीम रक्कम जमा करण्याचा निर्णय नुकताच जाहीर केला आहे. मात्र, वाढती महागाई, शेतीचा खर्च, कर्जाचा डोंगर आणि कुटुंबांच्या गरजा पाहता पाच हजार रुपयात दिवाळी साजरी करायची तरी कशी? असा प्रश्न शेतकरी उपस्थित करत आहेत. यंदा पावसाभावी खरीप हंगामातील पिकांची वाढ खुंटली आहे. काही भागात सोयाबीन, मुग, तुर,



उडीद, कापूस, ज्वारी आणि मक्का या पिकांच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. बियाणे, खते, औषधे मशागतीसाठी लागत आहेत. शेतकऱ्यांनी मोठा खर्च केला, मात्र अपेक्षित उत्पादन मिळण्याची खात्री राहिलेली नाही. त्यामुळे शेतीत गुंतवलेला पैसा वसूल होणार की नाही, याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. दिवाळी म्हटले की घरातील लहान मुलांची नवीन कपडे, फराळाचे साहित्य, मिठाई, घरातील आवश्यक वस्तू आणि मुलांच्या शाळा, कॉलेजचा खर्च ग्रामीण भागातील शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांना या खर्चाची जुळवाजुळ करताना मोठी कसरत करावी लागत आहे. मुख्यमंत्र्यांनी नुकतीच जाहीर केलेली पाच हजार रुपयांची अग्रीम मदत काही प्रमाणात दिलासा देणारी असली तरी, प्रत्यक्षात यातुन काही भागणार नाही. ही मदत दिवाळीच्या खर्चासाठी उपयोगी पडली, तरी कर्जाची परतफेड, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि पुढील पेरणीसाठी लागणारा पैसा यांचे काय, असा प्रश्न कायम आहे.त्यामुळे केवळ सणापूर्ती मदत न देता नुकसान भरपाई, पिक विमा आणि पुढील हंगामासाठी आर्थिक आधार वेळेत मिळावा.पाच हजार रुपयाची मदत प्रत्यक्षात किती दिलासा देणार, यापेक्षा संकटातून बाहेर पडण्यासाठी शासनाकडून ठोस मदत कधी मिळणार दिवाळीसाठी पाच हजार रुपये देण्यापेक्षा शेतीच्या नुकसानीची योग्य भरपाई वेळेत मिळणे महत्त्वाचे आहे. यंदा पिक हातचे गेले तर पुढील हंगामासाठी पैसा कुठून आणायचा आणि कर्ज कसे फेडायचे? शासनाने केवळ सणापूर्ती मदत न देता नुकसान भरपाई, पिकविमा आणि पुढील पेरणीसाठीही ठोस आर्थिक आधार द्यावा अशी मागणी होत आहे.

# मांडवीच्या युवकांकडून शाहीर नागोराव गुरुनुले यांना मदत

मांडवी/प्रतिनिधी-विदर्भ, मराठवाडा आणि तेलंगणा भागात आपल्या ओजस्वी वाणी व लोककलेच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे मोठे कार्य करणारे प्रसिद्ध शाहीर नागोराव गुरुनुले (रा.मांडवी) हे सध्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे आणि वाढत्या वयामुळे त्रस्त आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती जेमतेम असून शासनाकडून कोणतीही मदत मिळत नसल्याची चर्चा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर सुरू होती. या गोष्टीची गंभीर दखल घेत दि.१८ रोजी मांडवी येथील होतकरू युवकांनी थेट शाहीर गुरुनुले यांच्या घरी जाऊन त्यांची आस्थेवाईक भेट घेतली.

या भेटीदरम्यान युवकांनी शाहिरांच्या प्रकृतीची विचारपूस करत जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि त्यांच्याशी दिलखुलास चर्चा केली. या कठीण काळात लोकनेते प्रकाश पाटील आणि विजय पाटील यांनी यापूर्वी केलेल्या मदतीचा शाहीर नागोराव यांनी या वेळी आवर्जून उल्लेख केला. या प्रसंगी मांडवीच्या युवकांनी शाहीर गुरुनुले यांना सढळ हाताने आर्थिक मदत सुपूर्द केली.विशेष म्हणजे, यापूर्वी देखील याच युवकांनी पिंपळगाव फाटा येथे अतिवृष्टीमुळे संसार उघड्यावर आलेल्या बाधित कुटुंबांना धावून जात आर्थिक मदत केली होती. मांडवीच्या युवकांच्या या संवेदनशील आणि सामाजिक जाणिजेच्या कार्याचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे.

# ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदांमुळे रुग्णसेवा धोक्यात

माहूर/प्रतिनिधी-आदिवासीबहुल माहूर तालुक्यातील गरीब आणि सर्वसामान्य रुग्णांसाठी महत्त्वाचा आधार असलेल्या ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदांचा प्रश्न गंभीर बनला आहे. वैद्यकीय अधीक्षकांचे पद १० जानेवारी पासून रिक्त असून, सहाय्यक अधीक्षकांचे पदही दीड वर्षापासून रिक्त आहे. त्यातच सातपैकी पाच अधिपरिचारिकांना कार्यमुक्त करण्यात आले असून, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकाऱ्यांची दोन्ही पदे रिक्त आहेत. त्यामुळे रुग्णालयाचा कारभार आणि रुग्णसेवेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

माहूर हा दुर्गम आणि आदिवासीबहुल तालुका असल्याने अनेक नागरिकांना खासगी रुग्णालयांमध्ये उपचार घेणे परवडत नाही. अशा परिस्थितीत ग्रामीण रुग्णालयातील मनुष्यबळाची कमतरता रुग्णांसाठी अडचणीची ठरू शकते. दंत शल्यचिकित्सक, वाहनचालक, शिपाई आणि सफाई कामगारांची प्रत्येकी एक जागाही रिक्त आहे. ८ जून रोजी सातपैकी पाच परिचारिकांच्या बदल्या झाल्यानंतर त्यांना कार्यमुक्त करण्यात आले. मात्र, त्यांच्या जागी नवीन कर्मचारी रुजू होण्यापूर्वी पर्यायी व्यवस्था करण्यात आली होती का, असा सवाल उपस्थित होत आहे. आधीच कर्मचाऱ्यांची कमतरता असताना परिचारिकांना कार्यमुक्त करण्याच्या निर्णयामुळे उर्वरित कर्मचाऱ्यांवरील ताण वाढण्याची शक्यता आहे. रुग्णालय प्रशासनाने रिक्त पदांची माहिती १३ ऑक्टोबर रोजी जिल्हा शल्यचिकित्सकांकडे सादर केल्याचे समजते. मात्र, पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आणि नियुक्त्यांना किती कालावधी लागणार, याबाबत स्पष्टता नाही. विशेषतः प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकाऱ्यांची दोन्ही पदे रिक्त असल्याने आवश्यक वैद्यकीय तपासण्यांच्या व्यवस्थेबाबतही चिंता व्यक्त होत आहे. गत महिन्यात अनुसूचित जमाती समितीच्या माहूर दौऱ्यावेळी जिल्हा शल्यचिकित्सकांनी माध्यमांशी बोलताना, तक्रारी करत राहाल तर माहूरच्या ग्रामीण रुग्णालयाला कुलूप लागेल, असे वक्तव्य केल्याचा दावा केला जात आहे. रिक्त पदांचा प्रश्न ऐरणीवर आल्याने या कथित वक्तव्याची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. रुग्णालयातील त्रुटी प्रशासनाच्या निदर्शनास आणून देणे हा नागरिकांचा आणि माध्यमांचा अधिकार असल्याने या वक्तव्याचा नेमका संदर्भ जिल्हा शल्यचिकित्सकांनी स्पष्ट करणे आवश्यक आहे.




दसरा सणानिमित्त नांदेड शहरातील बाजारपेठेत पुजेसाठी लागणारे ऊस, फुले, केळीचे पाने व इतर साहित्य विक्रीसाठी दाखल झाले असून दुष्काळामुळे पुजेच्या साहित्याच्या दरात वाढ झाली आहे.

# कंत्राटदारांची प्रलंबित देयके तातडीने देण्याची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-राज्यातील विविध विभागांतील कंत्राटदारांची प्रलंबित देयके तातडीने अदा करावीत, तसेच कंत्राटदारांच्या विविध प्रश्न, समस्या व अडचणी सोडविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, या मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांची भेट घेवून निवेदन देण्यात आले.

राज्यातील जलजीवन मिशन, सार्वजनिक बांधकाम विभाग, आदिवासी विकास विभाग, पर्यटन विभाग, ग्रामविकास विभाग, जलसंपदा विभाग तसेच समग्र शिक्षा अभियानांतर्गत करण्यात आलेल्या कामांची कोट्यवधी रुपयांची देयके गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे कंत्राटदारांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून, त्यांच्या व्यवसायावरही परिणाम होत आहे.प्रलंबित देयकांमुळे निर्माण झालेल्या आर्थिक अडचणी, शासनाकडून वेळेत देयके न मिळणे आणि कंत्राटदारांच्या विविध प्रश्नांकडे होणारे दुर्लक्ष याबाबत संघटनेने चिंता व्यक्त केली. कंत्राटदारांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने तातडीने उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, प्रलंबित देयके अदा करावीत तसेच कंत्राटदारांना आर्थिक दिलासा देण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.यावेळी जिल्हाध्यक्ष बालाजी नाईक, मनोज बरगळ, चंद्रमुनी सावंत, विनायक शिंदे, शेख नजीर, दिगंबर वाघमारे, चक्रधर मोरे, गुरुनाथ हुबांड, नचिकेत बंडेवार, त्र्यंबक शिंदे, श्रीधर कदम, भीमराव अंबुरे, वामन राठोड व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# बोधडीच्या मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहामधील गैरव्यवहाराची चौकशीची मागणी

किनवट/प्रतिनिधी-बोधडी बु. येथील मागासवर्गीय मुलांच्या शासकीय अनुदानित वसतिगृहात गेल्या अकरा वर्षांपासून आर्थिक गैरव्यवहार, अपहार व मनमानी कारभार सुरू असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

याप्रकरणी वसतिगृहाचे अधीक्षक (वॉर्डन) आणि सचिवांची सन २०१५-१६ पासून आजपर्यंतच्या सर्व आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांना त्वरित निलंबित करण्यात यावे, अन्यथा आमरण उपोषण छेडण्याचा इशारा समाज कल्याण अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. वसतिगृहाला ७५ विद्यार्थ्यांची मान्यता असताना प्रत्यक्षात ३० ते ३५ मुलेच उपस्थित असतात. कोरोना काळात विद्यार्थी निवासी नसतानाही ७५ विद्यार्थ्यांच्या नावाने पूर्ण अनुदान उचलून शासनाची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. समाज कल्याण विभागाकडून विद्यार्थ्यांसाठी प्राप्त झालेले संगणक संच अधीक्षक व सचिवांनी संगनमत करून परस्पर विकल्याचा गंभीर आरोप करण्यात आलाय. अधीक्षकांनी स्वतःच्या पत्नीची स्वयंपाकी पदी बेकायदेशीर नियुक्ती करून पगार लाटलाय. निवृत्त कर्मचाऱ्यांच्या जागी लाखो रुपये घेऊन मनमानी पद्धतीने भरती केली आहे. याशिवाय अधीक्षक व सचिवांनी संयुक्त खाते उघडून पोषण आहाराच्या निधीत गैरव्यवहार करत विद्यार्थ्यांना अत्यंत निकृष्ट दर्जाचे जेवण दिले. दोन खोल्यांच्या बांधकामासाठी आलेल्या अनुदानातून निकृष्ट दर्जाचे काम करून निधी लाटल्याचा घणाघात केलाय. याप्रकरणी वसतिगृहाचे सर्व अभिलेखे तात्काळ जप्त करून अधीक्षक व सचिवांवर निलंबनाची कारवाई करावी तसेच संगणक विक्री व कोरोना काळातील अनुदान अपहाराबाबत फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती नांदेडचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय समाज कल्याण अधिकारी आणि मंत्री संजय शिरसाट यांना पाठवण्यात आल्या आहेत. हे निवेदन बोधडी येथील गजानन मुंडे, मारोती शिंगारे आणि श्रीनिवास जमादार यांनी दिले असून चौकशी न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. या आरोपातील तथ्यता जाणून घेण्यासाठी संबंधितांशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला पण संपर्क होऊ शकला नाही.

# जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड;सात आरोपी ताब्यात

कुंडलवाडी/प्रतिनिधी-कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिपंळगाव (कुं) शिवारात सूरू असलेला जुगार अड्यावर कुंडलवाडी पोलिसांनी धाड टाकुन सात आरोपीनां ताब्यात घेवून गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत रोख रक्कमेसह तिन मोटार सायकली आणि जुगाराचे साहित्य असा १ लाख ३१ हजार १४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




पिपंळगाव (कुं) शिवारातील महालक्ष्मी मंदिराच्या बाजूला काही जण संगनमताने गोलाकार बसून तिर्रट नावाचा जुगार पत्यांवर पैसे लावून खेळला जात असल्याची माहिती कुंडलवाडी पोलीसांना मिळाल्यानंतर पोलीसांनी धाड टाकून सात जणाना ताब्यात घेवून आरोपीकडून रोख ११ हजार १४० रुपये तसेच तिन मोटार सायकली प्रत्येकी ४० हजार रुपये किंमतीच असे एकूण १ लाख ३१ हजार १४० (एकशे चाळीस) रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात येवुन कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सहाय्यक पोलीस निरिक्षक ज्ञानेश्वर शिंदे पो.हवालदार संगेवार, चालक रामेश्वर पाटील, रविंद्र देशमूख, शिवराज गंगूलवार साईनाथ पुजरवाड, अजय बोलमवार, तसेच होमगार्ड या कार्यवाहीत सहभाग घेतला.

# अमरावतीत नवजात बाळाच्या विक्रीचा आरोप;साडेतीन लाखांच्या व्यवहाराची चर्चा!

अमरावती:अमरावती शहरात अल्पवयीन मुलीच्या प्रसूतीनंतर तिच्या नवजात बाळाची कथितरीत्या साडेतीन लाख रुपयांना विक्री केल्याच्या आरोपामुळे खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील कथित आर्थिक व्यवहारा संदर्भातील ध्वनिमुद्रिका समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर हा प्रकार चर्चेत आला. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात एका महिला डॉक्टरसह तिचा पती आणि एका अल्पवयीन मुलाविरुद्ध पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.

शिंदे गटाच्या शिवसेनेच्या सहसंपर्कप्रमुख वर्षा भोयर आणि युवती सेना प्रमुख कोमल बद्रे यांनी हे प्रकरण उघडकीस आणल्याचे सांगण्यात येत आहे. अल्पवयीन मुलीची प्रसूती केल्यानंतर नवजात बाळाच्या कथित विक्रीचा व्यवहार झाल्याचा आरोप महिला डॉक्टरवर करण्यात आला आहे. या व्यवहारात साडेतीन लाख रुपयांची देवाणघेवाण झाल्याची चर्चा असून, त्यासंदर्भातील ध्वनिमुद्रिका समोर आल्याने प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे.या प्रकरणात एका अल्पवयीन मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे सांगण्यात येत असून, महिला डॉक्टर आणि तिचा पती फरार असल्याची माहिती आहे. मात्र, नवजात बाळाची विक्री नेमकी कोणाला करण्यात आली, बाळ सध्या कोणाकडे आहे आणि कथित आर्थिक व्यवहारात आणखी कोणाचा सहभाग आहे, याबाबत अधिकृत तपशील अद्याप स्पष्ट झालेला नाही.

पान १ वरुन

## राज्यात वादळी...

वादळी पाऊस पडण्याचा अंदाज आहे. अनेक जिल्ह्यांत हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. नैऋत्य अरबी समुद्रात चक्राकार वाऱ्यांच्या प्रभावामुळे कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. उत्तर कर्नाटक परिसरातही चक्राकार वाऱ्यांची स्थिती असून, लक्षद्वीपपासून कर्नाटकमार्गे आंध्र प्रदेशापर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. या हवामान प्रणालींमुळे काही भागांत पावसासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. नाशिक शहरात उकाड्याचा त्रास कायम असून, रविवारी कमाल तापमान ३४.६ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २० अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले. दुपारी आकाशात ढग दाटून आले, तरी दमट हवामानामुळे नागरिक हैराण झाले. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली, वैभववाडी तसेच रत्नागिरी शहर परिसर आणि चिपळूण येथे रविवारी विजांच्या कडकडाटासह पाऊस झाला. रत्नागिरीत हलक्या सरी कोसळल्या, तर संगमेश्वर तालुक्यातील देवरूख परिसरातही पावसाने हजेरी लावली. हवामानातील बदल लक्षात घेता नागरिकांनी सतर्क राहावे. वादळी पावसाच्या वेळी झाडांखाली किंवा विद्युत खांबांजवळ थांबणे टाळावे आणि हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करावे.

## युवा महोत्सवातून...

सहभाग महत्त्वाचा असून विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचा सातत्याने विकास करावा, असे त्या म्हणाल्या.

**सात्वीक आहार आणि व्यायामाला महत्व द्या-अॅड.अग्रवाल**

विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास, व्यायाम आणि सात्त्विक आहार या तीन गोष्टींचा जीवनात अवलंब करावा, असा सल्ला त्यांनी दिला. आयोजनात काही त्रुटी राहिल्या असल्यास त्यांची दखल घेऊन भविष्यात अधिक चांगले नियोजन केले जाईल, असेही त्यांनी सांगितले. विविध स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, संयोजन समिती आणि स्वयंसेवकांनी योगदान दिले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा गौरव आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश देत ज्ञानतीर्थ-२०२६ युवा महोत्सवाची सांगता झाली. या समारंभास विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, डॉ. सूर्यकांत जोगदंड, डॉ. संतराम मुंढे, डॉ. डी. एन. मोरे, प्रा.डॉ.ए.टी.शिंदे, डॉ. सुरेखा भोसले, डॉ. हनुमंत कँधारकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे, प्राचार्य डॉ. विकास सुकाळे, महोत्सवाचे संयोजन सचिव डॉ. प्रशांत सुतकर यांच्यासह आयोजन व विद्यापीठाच्या विविध समित्यांचे सदस्य उपस्थित होते.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४